# SYBA : LOGIC AND PRINCIPLES OF REASONING

Core Course 2 D (CC 1D)

## Semester Fourth : Quantification and Relational Logic

Subject Code - 24363

## MCQ सराव प्रश्नसंच

क्रेडिट पहिले

## विधेय तर्कशास्त्र

**बहूपर्यायी प्रश्न (MCQ) :**

1. युक्तिवाद वैध असल्याचे ......नियमांच्या आधारे सिध्द करता येते.

अ) अनुमानाच्या

ब) स्थानांतरणाच्या

क) सत्यता मूल्याच्या

**ड) अ व ब दोन्ही**

2. विधेय तर्कशास्त्राची गरज का निर्माण झाली ?

अ) सामान्यवाची विधानांचे चिन्हांकन करण्यासाठी

ब) संख्यापकीय युक्तिवादाची नैगमनिक सिध्दता देण्यासाठी

क) विधान तर्कशास्त्रातील अपुरेपणा भरून काढण्यासाठी

**ड) वरीलपैकी सर्व**

3. अविनाश इंजीनियर होणार किंवा डॉक्टर होणार.

अविनाश इंजीनियर होणार नाही.

म्हणून ..................

या युक्तिवादातील रिकाम्या जागी योग्य विधान लिहा.

अ) अविनाश इंजीनियर होणार आहे.

**ब) अविनाश डॉक्टर होणार आहे.**

क) अविनाश डॉक्टर होणार नाही.

ड) अविनाश इंजीनियर व डॉक्टर होणार आहे.

4. खालीलपैकी कोणता एक सामान्य विधानाचा प्रकार नाही ?

अ) A

ब) E

क) I

**ड) U**

5. सर्ववाची विधानांचे चिन्हांकन करण्यासाठी खालीलपैकी कोणते संख्यापक (चिन्ह) वापरले जाते ?

**अ) (X)**

ब) (∃X)

क) ∅

ड) Ψ

6. काहीवाची विधानांचे चिन्हांकन करण्यासाठी खालीलपैकी कोणते संख्यापक (चिन्ह) वापरले जाते ?

अ) (X)

**ब) (∃X)**

क) ∅

ड) Ψ

7. ........ हे पारंपारिक तर्कशास्त्र व विधान तर्कशास्त्राचे विकसित रूप आहे.

अ) विधान तर्कशास्त्र

**ब) विधेय तर्कशास्त्र**

क) आकारिक तर्कशास्त्र

ड) नैगमनिक तर्कशास्त्र

8. संख्यीकारकाचे एकूण नियम किती आहेत?

अ) दोन

ब) तीन

**क) चार**

ड) पाच

9. खालीलपैकी कोणता एक संख्यीकारकाचा नियम नाही?

अ) वैश्विक उदाहरणीकरण (U.I.)

ब) वैश्विक सामान्यीकरण (U.G.)

क) अस्तित्वदर्शक उदाहरणीकरण (E.I.)

**ड) उदाहरणीकरण – सामान्यीकरण (I.G.)**

10. खालीलपैकी विसंगत घटक ओळखा.

अ) एकवाची विधान

ब) सर्ववाची विधान

**क) सामान्यवाची विधान**

ड) काहीवाची विधान

11. ज्या विधानात एका विशिष्ट वस्तू अथवा व्यक्तीबाबत माहिती दिलेली असते, त्या विधानास ....... असे म्हणतात.

**अ) एकवाची विधान**

ब) सर्ववाची विधान

क) काहीवाची विधान

ड) संयुक्त विधान

12. एकवाची विधानाचे विश्लेषण केल्यास विधानात किती घटक आढळून येतात?

अ) दोन

**ब) तीन**

क) चार

ड) पाच

13. एकवाची विधानात ज्याच्याबद्दल निवेदन अथवा कथन केलेले असते, त्यास ....... पद असे म्हणतात.

**अ) उद्देश**

ब) विधेय

क) संयोजक

ड) विशेषण

14. एकवाची विधानात उद्देश पदाबद्दल जे निवेदन अथवा कथन केलेले असते, त्यास ....... पद असे म्हणतात.

अ) उद्देश

**ब) विधेय**

क) संयोजक

ड) क्रियापद

15. उद्देश व विधेय यांना जोडणाऱ्या पदास ....... असे म्हणतात.

अ) उद्देश

ब) विधेय

**क) संयोजक**

ड) संधी

16. 'ताजमहाल सुंदर आहे.' या विधानातील विधेय पद कोणते ?

अ) ताजमहाल

**ब) सुंदर**

क) आहे

ड) वरील सर्व

17. सामान्यवाची विधानाचे किती प्रकार पडतात ?

**अ) दोन**

ब) तीन

क) चार

ड) पाच

18. ज्या विधानात सर्वांबद्दल माहिती सांगितलेली असते, त्याला ........ विधान असे म्हणतात.

**अ) सर्ववाची (सार्वत्रिक)**

ब) एकवाची

क) काहीवाची (अस्तित्वदर्शक)

ड) संयुक्त (मिश्र)

19. ज्या विधानात काहीसंबंधी माहिती सांगितलेली असते, त्याला ....... विधान असे म्हणतात.

अ) सर्ववाची (सार्वत्रिक)

**ब) काहीवाची (अस्तित्वदर्शक)**

क) एकवाची

ड) साधे

20. एकही शिक्षक निरीक्षर नसतो. हे विधान कोणत्या प्रकारचे आहे ?

अ) एकवाची

**ब) सर्ववाची**

क) काहीवाची

ड) यापैकी नाही

21. काही साप विषारी असतात. हे विधान कोणत्या प्रकारचे आहे ?

अ) एकवाची

ब) सर्ववाची

**क) काहीवाची**

ड) सोपाधिक

22. राम हुशार आहे. या विधानाचे योग्य चिन्हांकन सांगा.

अ) rH

ब) HR

क) Rh

**ड) Hr**

23. x मानव आहे. (Hx) या विधानातील x हे अक्षर ...... आहे.

अ) व्यक्ति अचल

**ब) व्यक्ति चल**

क) विधेय अचल

ड) विधेय चल

24. विधानातील विधेय पदाचे आद्य अक्षर इंग्रजी मोठ्या लिपीत घेतले जाते, तेव्हा त्यास ....... म्हणतात.

अ) व्यक्ति अचल

ब) व्यक्ति चल

**क) विधेय अचल**

ड) विधेय चल

25. विधेय चलासाठी खालीलपैकी कोणते चिन्ह वापरले जाते ?

अ) ∅

ब) Ψ

**क) अ व ब दोन्ही**

ड) (∃x)

26. सॉक्रेटिस मानव आहे. – Hs या विधानातील विधेय चल कोणते ?

अ) सॉक्रेटिस (s)

**ब) मानव (H)**

क) आहे

ड) यापैकी नाही.

27. ज्यामध्ये व्यक्तीचर असतात, त्याला ......... म्हणतात.

अ) विधान

**ब) विधानीय फलन**

क) चिन्हबंध

ड) विधानाकार

28. विधानीय फलनाच्या संदर्भात खालीलपैकी बरोबर विधान कोणते ?

अ) कोणत्याही विधानीय फलनात किमान एक किंवा दोन्हीही घटक अनिश्चित स्वरुपाचे असतात.

ब) विधान किंवा प्रकथन फलन हे सत्यही नसते आणि असत्यही नसते.

क) विधान फलने ही जशी भावात्मक असतात, तशीच ती निषेधात्मक स्वरुपाचीही असतात.

**ड) वरील सर्व विधाने बरोबर आहेत.**

29. बर्ट्रॉंड रसेल यांच्या मते विधानीय फलन म्हणजे अशा प्रकारचा चिन्हबंध की.....

अ) जो व्यक्तीचर व विधेय अचर यापासून तयार होत असतो.

ब) जो व्यक्ती अचर व विधेय चर यापासून तयार होत असतो.

क) जो व्यक्ती चर व विधेय चर यापासून तयार होत असतो.

**ड) सर्व बरोबर**

30. विधानीय फलनापासून विधाने मिळविण्यासाठी खालीलपैकी कोणती पध्दत वापरली जाते ?

अ) उदाहरणीकरण

ब) सामान्यीकरण

**क) अ व ब दोन्ही**

31. साध्या विधानीय फलनापासून उदाहरणीकरणाने ........... विधाने मिळतात.

अ) संबंधवाची

ब) सामान्यवाची

**क) एकवाची**

ड) मिश्र

32. मिश्र विधानीय फलनापासून सामान्यीकरणाने ......... विधाने मिळतात.

अ) एकवाची

ब) संबंधवाची

क) मिश्र

**ड) सामान्यवाची**

क्रेडिट दुसरे

## संशोधन पध्दती

**MCQ प्रश्न :**

1. कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा पुन्हा परिक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक अभ्यास म्हणजे ........ होय.

**अ) संशोधन**

ब) अनुमान

क) निरीश्रण

ड) पध्दती

2. संशोधन पध्दती म्हणजे ......

अ) नवीन तथ्य शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परिक्षण करण्याची एक पध्दत.

ब) व्यवस्थापनातील समस्याची पध्दतशीर तपासणीची प्रक्रिया.

क) 'व्यवस्थापकीय घटनांचा अभ्यास, नवीन तथ्यांचा शोध व जुन्या तथ्यांचे परिक्षण करण्याची पध्दती.

**ड) वरील सर्व बरोबर**

3. संशोधन करीत असताना, ज्या पध्दती किंवा तंत्रे उपयोगी पडतात, त्याला काय म्हणतात ?

अ) साधने

**ब) संशोधन पध्दती**

क) संशोधन प्रक्रिया

ड) यापैकी नाही

4. संशोधन पध्दती ही संशोधनाची ........ साधने आहेत.

अ) संश्लेषणात्मक

ब) स्पष्टीकरणात्मक

**क) विश्लेषणात्मक**

ड) आकारिक

5. खालीलपैकी विसंगत घटक ओळखा.

अ) समस्या सूत्रण

ब) संशोधन आराखडा

क) तथ्यांचे संकलन

**ड) नियोजन**

6. खालीलपैकी कशाचा संशोधनाच्या पायरीमध्ये समावेश करता येणार नाही ?

अ) समस्या सूत्रण

**ब) प्रयोग**

क) सामान्यीकरण

ड) अहवाल

7. ........ ही संशोधनाचीपहिली पायरी आहे.

अ) गृहितकृत्याची निर्मिती

ब) संशोधन आराखडा

क) तथ्यांचे संकलन

**ड) समस्या सूत्रण**

8. संशोधनाची दिशा निर्धारित करण्यासाठी संशोधन समस्येचे एक संभाव्य उत्तर शोधले जाते. या संभाव्य उत्तराला .......... असे म्हणतात.

**अ) गृहितकृत्य (सिध्दांत कल्पना)**

ब) निष्कर्ष

ब) अनुमान

ड) तथ्य

9. संशोधन अहवाल तयार करताना पुढीलपैकी कोणत्या गोष्टींचा समानेश केला जातो.

अ) प्रस्तावना

ब) गृहीत कृत्य

क) अध्ययन पध्दती

**ड) वरील सर्व**

10. खालीलपैकी कोणते शास्त्र सामाजिक शास्त्र नाही.

अ) इतिहास

**ब) जीवशास्त्र**

क) राज्यशास्त्र

ड) अर्थशास्त्र

11. सामाजिक शास्त्रातील संशोधनाच्या संदर्भात पुढीलपैकी योग्य विधान कोणते?

अ) सामाजिक शास्त्रातील संशोधनात माणूस केंद्रस्थानी असतो.

ब) सामाजिक शास्त्रातील संशोधन समाजाचा अभ्यास करते.

**क) अ व ब दोन्ही**

ड) सामाजिक शास्त्रातील संशोधन प्रयोगशाळेत केले जाते.

12. कोणत्या संशोधनामध्ये समाज हीच प्रयोगशाळा असते?

**अ) सामाजिक**

ब) नैसर्गीक

क) शास्त्रीय

ड) यापैकी नाही

13. संशोधन हे .........वर आधारलेले असते.

**अ) तथ्य संकलन**

ब) निरीक्षण

क) प्रयोग

ड) अहवाल

14. खालीलपैकी तथ्य संकलनाचे वैशिष्ट्य कोणते?

अ) तथ्य ही एक अशी घटना आहे की, जी वास्तविक रुपात घडलेली आहे.

ब) तथ्य हे मूर्त व अमूर्त अशा दोन्ही प्रकारचे असू शकते.

क) तथ्याचे वास्तविक निरीक्षण करता येते.

**ड) वरील सर्व**

15. तथ्य संकलनाचे किती प्रकार आहेत?

अ) चार

ब) तीन

**क) दोन**

ड) पाच

16. प्रत्यक्ष लोकांद्वारे प्राप्त झालेली माहिती त्यांना........ म्हणतात.

अ) प्रमाण

**ब) प्राथमिक तथ्ये**

ड) दुय्यम तथ्ये

ड) ज्ञान

17. ग्रंथ, जनगणना अहवाल, वृत्तपत्रे, संशोधनपत्रिका, प्रकाशित बातम्या, लेख इत्यादींना ...... तथ्ये म्हणतात.

अ) संभाव्य तथ्ये

ब) प्राथमिक तथ्ये

**क) दुय्यम तथ्ये**

ड) प्रकाशित तथ्ये

18. दुय्यम तथ्यामध्ये खालीलपैकी कशाचा समावेश करता येणार नाही ?

अ) डायरी

ब) आत्मकथा

क) वृत्तपत्रे

**ड) मुलाखत**

19. खालीलपैकी तथ्य संकलनाचे उपयोग कोणते ?

अ) संशोधनाचा आधार

ब) कार्यकारण संबंधाचा शोध

क) समस्या निराकरणात सहाय्यक

**ड) वरील सर्व बरोबर**

20. खालीलपैकी माहिती संकलनाची कोणती पध्दत नाही.

अ) सर्वेक्षण

ब) मुलाखत

क) प्रश्नावली

**ड) प्रयोग**

21. विविध भाषांचा अभ्यास करण्यासाठी खालीलपैकी कोणती पध्दत उपयुक्त ठरते ?

**अ) सर्वेक्षण**

ब) मुलाखत

क) प्रश्नावली

ड) निरीक्षण

22. खालीलपैकी सर्वेक्षण पध्दतीचे गुण कोणते ?

अ) सर्वेक्षणात वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केल्यामुळे निष्कर्ष अधिक शास्त्रशुध्द असतात.

ब) सर्वेक्षाणात अभ्यासकाचा आपल्या विषयाशी प्रत्यक्ष संबंध नसतो.

क) समाजातील प्रमुख प्रवृत्तींचा रोख कोणीकडे आहे हे सर्वेक्षणाद्वारा स्पष्ट होते.

**ड) अ व क बरोबर**

23. खालीलपैकी सर्वेक्षण पध्दतीचा दोष कोणता ?

अ) व्यक्तिगत संशोधनासाठी संशोधन फारसे उपयुक्त नाही.

ब) सर्व सामाजिक शास्त्रांना ही पध्दती उपयोगी पडू शकत नाही.

क) सर्वेक्षण हे अत्यंत खर्चिक व गुंतागुंतीचे असते.

**ड) वरील सर्व बरोबर**

24. ........ म्हणजे व्यावहारिक अर्थाने पाहणे किंवा अवलोकन करणे होय.

अ) सर्वेक्षण

**ब) निरीक्षण**

क) प्रयोग

ड) दृष्टीक्षेप

25. खालीलपैकी कोणता निरीक्षणाचा प्रकार नाही?

अ) अनियंत्रित निरीक्षण आणि नियंत्रित निरीक्षण

ब) सहभागी निरीक्षण आणि असहभागी निरीक्षण

**क) वैयक्तिक निरीक्षण आणि गट निरीक्षण**

ड) अर्ध-सहभागी निरीक्षण आणि सामूहिक निरीक्षण

26. कोणत्या निरीक्षणात सहभागी व असहभागी या दोन्ही पध्दतीमधील गुणांचा समन्वय करण्यात आला आहे.

**अ) अर्ध-सहभागी**

ब) अनियंत्रित

क) नियंत्रित

ड) सामूहिक

27. खालीलपैकी निरीक्षण तंत्राचा गुण कोणता?

अ) निरीक्षण करताना विशेष ज्ञानाची आवश्यकता असते.

**ब) निरीक्षणातून काढलेले निष्कर्ष हे यथार्थ व विश्वसनीय असतात.**

क) निरीक्षण ही अतिशय गुंतागुंतीची पध्दत आहे.

ड) या पध्दतीत संकलित केलेल्या तथ्यांची पडताळणी करता येत नाही.

28. खालीलपैकी निरीक्षण पध्दती तंत्राचे दोष कोणते आहेत?

अ) सर्वच घटनांचे निरीक्षण केले जाऊ शकत नाही.

ब) नियंत्रित निरीक्षणाचा अपवाद सोडल्यास निरीक्षणकर्त्यावर कोणत्याच प्रकारचे नियंत्रण नसते.

क) निरीक्षणासाठी किती कालावधी लागेल हे निश्चित सांगता येत नाही.

ड) वरील सर्व बरोबर

29. एखाद्या विषयासंदर्भात व्यक्तीकडून माहिती मिळविण्यासाठी तयार केलेली प्रश्नांची एक क्रमबध्द सूची म्हणजे ....... होय.

अ) तालिका

**ब) प्रश्नावली**

क) मुलाखत

ड) अनुसूची

30. प्रश्नावलीच्या संदर्भात खालीलपैकी अयोग्य विधान कोणते?

अ) प्रश्नावलीतील प्रश्नांची भाषा अतिशय स्पष्ट असते.

ब) प्रश्नावलीद्वारे प्राप्त होणारी तथ्ये ही अधिक यथार्थ व वस्तूनिष्ठ असतात.

**क) प्रश्नावली ही वेळखाऊ व खर्चिक पध्दत आहे.**

ड) गोपणीय आणि महत्त्वपूर्ण तथ्यांचे संकलन प्रश्नावलीद्वारे केले जाते.

31. खालीलपैकी कशाचा प्रश्नावलीच्या प्रकारामध्ये समावेश करता येणार नाही?

अ) संरचित प्रश्नावली

ब) बंदिस्त प्रश्नावली

क) मुक्त प्रश्नावली

**ड) तार्किक प्रश्नावली**

32. व्यक्तीच्या मनातील भावना, हेतू, विचार, तिचे दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी ...... हे सर्वोत्कृष्ट साधन आहे.

**अ) मुलाखत**

ब) प्रयोग

क) निरीक्षण

ड) मनोविश्लेषण

क्रेडीट तिसरे

# संबध तर्कशास्त्र

## MCQ प्रश्न :

1........ तर्कशास्त्राला विधेय तर्कशास्त्राचे विकसित रूप आहे, असे म्हटले जाते.

अ) पारंपारिक तर्कशास्त्र

ब) विधान तर्कशास्त्र

**क) संबंध तर्कशास्त्र**

ड) यापैकी नाही

2. खालीलपैकी संबंधवाची विधान कोणते ?

अ) नितीन प्रामाणिक आहे.

**ब) प्लेटो सॉक्रेटिसचा शिष्य होता.**

क) सर्व आंबे गोड आहेत.

ड) काही भूकंप विनाशकारी असतात.

3. दोन किंवा दोनपेक्षा अधिक वस्तू, व्यक्ती अथवा घटनामधील संबंधाच्या तार्किक रचनेला .......... असे म्हणतात.

**अ) संबंधवाची तर्कशास्त्र**

ब) विधान तर्कशास्त्र

क) विधेय तर्कशास्त्र

ड) संगणक तर्कशास्त्र

4. ज्या विधानात दोन किंवा दोनपेक्षा अधिक पदामध्ये संबंध व्यक्त केला जातो, त्यास ...... विधान असे म्हणतात.

अ) एकवाची

**ब) संबंधवाची**

क) सर्ववाची

ड) संयुक्त विधान

5. खालीलपैकी संबंधवाची विधानाचे वैशिष्ट्ये कोणते ?

अ) संबंधवाची विधानातून अनेक प्रकारचे संबंध अभिव्यक्त होत असतात.

ब) संबंधवाची विधानात दोन पदे असतात. अ) संबंधाश्रय ब) संबंधाश्रित

क) संबंधवाची विधानात कमीत - कमी दोन संबंधित वस्तू किंवा व्यक्ती असल्याच पाहिजे.

**ड) वरील सर्व**

6. ज्या पदाकडून संबंध जातो त्याला .......म्हणतात.

अ) संबंधके

ब) संबंधाश्रित

**क) संबंधाश्रय**

ड) संबंधी

7. पहिल्या पदाकडून संबंध ज्या पदाकडे जात असतो, त्या पदास ........ पद असे म्हणतात.

अ) संबंधके

**ब) संबंधाश्रित**

क) संबंधाश्रय

ड) संबंधी

8. संबंधवाची विधानात जो संबंध सांगितला जातो, त्याला एक दिशा असते. ती दिशा दर्शविण्यासाठी कोणते चिन्ह वापरले जाते ?

**अ) →**

ब) ↲

क) ↑

ड) ↓

9. राम व लक्ष्मण भाऊ होते.या विधानात संबंधके कोणती आहेत?

अ) राम

ब) लक्ष्मण

क) भाऊ

**ड) अ व ब दोन्ही**

10. जेव्हा तीन पदामधील संबंध ज्या विधानातून सांगितला जातो, त्यास .....संबंधवाची विधान असे म्हणतात.

अ) द्विपद

**ब) त्रिपद**

क) चतुर्थपद

ड) पंचपद

11. सचिन, सेहवाग व विराट हे क्रिकेट खेळतात. हे विधान कोणत्या प्रकारचे आहे?

अ) द्विपद संबंधवाची

ब) त्रिपद संबंधवाची

**क) चतुर्थपद संबंधवाची**

ड) पंचपद संबंधवाची

12. दोन पदामधील संबंध ज्या विधानातून व्यक्त होतो, त्यास द्विपद संबंधवाची विधान असे म्हणतात."

**अ) द्विपद संबंधवाची**

ब) त्रिपद संबंधवाची

क) चतुर्थपद संबंधवाची

ड) पंचपद संबंधवाची

13. जेव्हा पाच पदापेक्षा जास्त पदामधील संबंध ज्या विधानातून व्यक्त होतो, तेव्हा त्यास अनेक पद संबंधवाची विधान असे म्हणतात.

अ) त्रिपद संबंधवाची

ब) चतुर्थपद संबंधवाची

क) पंचपद संबंधवाची

**ड) अनेकपद संबंधवाची विधान**

14. संबंधवाची विधानाचे चिन्हांकन करताना कमीत कमी किती अक्षरचिन्हे वापरावी लागतात?

अ) दोन

**ब) तीन**

क) चार

ड) पाच

15. संबंधकासाठी असलेले चिन्ह .....अक्षर असते.

अ) इंग्रजी मोठ्या लिपीतील

ब) ग्रीक लिपीतील फाय

**क) इंग्रजी लहान लिपीतील**

ड) यापैकी नाही

16. अकोले पुण्यापेक्षा लहान आहे. (a,p,Lxy) या संबंधवाची विधानाचे योग्य चिन्हांकन कोणते?

**अ) Lap**

ब) LAP

क) ~Lap

ड) apL

17. अनिल शामपेक्षा मोठा नाही पण रामपेक्षा मोठा आहे. (a, s, r, Bxyz) या विधानाचे योग्य चिन्हांकन सांगा.

अ) ~ Bas . ~Bar

**ब) ~ Bas . Bar**

क) Bas . Bar

ड) ~ Bas v Bar

18. काहीजन सर्वांना मदत करतात. या विधानाचे योग्य चिन्हांकन कोणते ?

अ) (Y) (∃x) Hxy

ब) (∃x) (Y)~ Hxy

**क) (∃x) (Y) Hxy**

ड) (∃x) (X) Hxy

19. सर्वजन सर्वांना आकर्षित करतात. या विधानाचे योग्य चिन्हांकन कोणते ?

अ) (X) Axy

ब) (X) (Y) ~Axy

क) (Y) (X) Axy

**ड) (X) (Y) Axy**

20. द्विवत्व संबंधाचे गुणधर्म एकूण किती प्रकारात विभागलेले आहेत ?

अ) दोन

**ब) तीन**

क) चार

ड) पाच

21. द्विवत्व संबंधाच्या गुणधर्माचा खालीलपैकी योग्य क्रम कोणता ?

अ) **सममात्रता, असममात्रता, विषममात्रता**

ब) प्रवाहिता, अप्रवाहिता, परावर्तीता

क) सममात्रता, प्रवाहिता, अपरावर्तीता

ड) सममात्रता, अप्रवाहिता, विषमपरावर्तीता

22. भारत पाकिस्तानचा शेजारी आहे. यावरून पाकिस्तान भारताचा शेजारी आहे. या विधानामध्ये कोणत्या प्रकारचा संबंध आहे ?

**अ) सममात्रता**

ब) असममात्रता

क) विषममात्रता

ड) प्रवाहिता

23.आन्वी तन्वीपेक्षा उंच आहे आणि तन्वी सान्वीपेक्षा उंच आहे. यावरून आन्वी सान्वीपेक्षा उंच आहे.या विधानात कोणत्या प्रकारचा संबंध आहे ?

**अ) प्रवाही**

ब) अप्रवाही

क) विषमप्रवाही

ड) परावर्ती

✡ ✡ ✡